# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०८/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

## मा. उच्च न्यायालय यांचे बंद बाबतचे आदेशाचे उल्लंघन केल्यास होईल कठोर कारवाई

उदया दिनांक २४/८/२०२४ रोजी काही राजकीय संस्थानी बंद जाहीर केला आहे. मा. उच्च न्यायालयाने कोणत्याही संस्थाला बंद पुकारण्याचा अधिकार नाही असे घोषित केले आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही यासाठी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दल सज्ज आहे. सर्व नागरीकांना ही सुचना दिली जात आहे की, कोणतीही व्यक्ती जबरदस्तीने दुकान किंवा इतर संस्था बंद करण्याचा प्रयत्न करील तेव्हा डायल ११२ या हेल्पलाईनवर कॉल करावा. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमाविरूद्ध फौजदारी कार्यवाही केली जाईल.

## पोलीस ठाणे रामटेक जि. नागपूर ग्रामिण कडुन चोरीचे गुन्हे उघडकिस आणुन मुदेमाल हस्तगत

पोलीस स्टेशन रामटेक गुन्हा रजि. क्र. ५६६/२०२४ कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.स. मध्ये दिवसा मोबाईलचे दुकानातुन मोबाईल कि. २९,०००/— रू. चा अज्ञात चोरांनी चोरून नेला होता. सदर गुन्ह्यात तांत्रीक माहीतीचे आधारे माहीती प्राप्त करून **आरोपी नामे १) महिला आरोपी २) लोकेशकुमार उर्फ लवी उपेंद्र नागेश वय ३५ वर्ष रा. सुखलीया बापट चौक, ३६३A वाटर टॅकजवळ, इंदौर (म.प्र.)** यांना निष्पन्न करण्यात आले असुन सदर गुन्ह्यात आरोपी क्र. १) महिला आरोपी हिस दि. १८/०८/२०२४ रोजी अटक करून तिचे ताब्यातुन १) सदर गुन्ह्यात चोरी केलेला OPPO F27 Pro+ 5G मोबाईल किंमती २९,०००/— रू. २) सदर आरोपीतांनी बुट्टीबोरी येथून चोरी केलेला VIVO Y2 Pro मोबाईल किंमती २७,९९९/—रू. ३) सदर आरोपीतांनी सावनेर येथुन चोरी केलेला Realme narjo 70x 5g मोबाईल किंमती १३,५००/— रू. व आरोपीतांनी गुन्हा करणेकरीता वापरलेली मरून रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्र. एम.एच.—३१/ई आर—४६५६ किंमती ५०,०००/— रू. एकुण किंमती १,२०,४९९/—रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ४) सदर दोन्ही आरोपीतांनी मिळुन पांढुर्णा, मध्यप्रदेश येथुन एस. के. ज्वेलर्स, पांढुर्णा येथुन एक सोन्याची अंगठी चोरी केली असल्याचे कबुली दिली आहे.

सदरची कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक यांचे मार्गदर्शनात पोनि प्रशांत काळे, पोउपनि श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगोले, पोना प्रफुल रंधई, पोना मंगेश सोनटक्के, पोना सतिश राठोड, पोशि शरद गिते, पोशि धिरज खंते यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर